# प्रकरण - पाचवे

---

# उपसंहार

# प्रकरण - पाचवे

## उपसंहार

हमीद दलवाई बुद्धीप्रामान्यवादी होते. धर्म आणि राजकारण या दोहोंची सरमिसळ त्यांना अमान्य होती. धर्मनिरपेक्ष भारतीय समाजाचा पुरस्कार त्यांनी जीवनभर केला. केवळ विचारांचे इमले ते उभा करण्यात गुंतले नाहीत तर आपल्या विचारांना प्रत्यक्ष कृतीमध्ये उतरविण्याची सतत धडपड केली. हमीद दलवाई हे तडफदार, बुद्धीमान व्यक्तीमत्व होते. स्वत: ते एक सृजनशील लेखक होते. कोणत्याही गोष्टीकडे बुद्धीनिष्ठेतून बघण्याची विलक्ष वृत्ती होती. स्वत: ते एक विचारवंत होते परंतु स्वत:ला विचारवंत म्हणवून घेत नव्हते तर सर्वसामान्य समाजसुधारक समजत होते.

भारतीय संविधानातील मूलभूत तत्त्वे त्यांना प्रिय वाटत. भारताची राष्ट्राची एकात्मता मजबूत व्हावी असे त्यांना वाटे. त्यांनी जवळ-जवळ चौदाशे वर्ष चालत आलेल्या मुस्लिम समाजातील कालबाह्य प्रथा, परंपरा रूढींच्या विरूद्ध आवाज उठविला. मुस्लिम जातीवादाची कारणे शोधण्याचा सतत प्रयत्न केला. हिंदू-मुस्लिम ऐक्य प्रस्तापित होऊन भारताच्या धर्मनिरपेक्ष समाजव्यवस्थेमध्ये शुद्ध वातावरण निर्माण व्हावे असे त्यांना नेहमी वाटे. हिंदू-मुस्लिम समाजात जातीय सलोखा रहावा दोन्ही समुदायातील जमातवाद संपुष्टात यावा असे त्यांना वाटत होते. मुस्लिम समाजामध्ये वाढलेल्या जातीवादाला नष्ठ करण्यासाठी त्यांनी इस्लामची कडक चिकित्सा केली. मुस्लिम समाज प्रबोधनासाठी त्यांनी २२ मार्च १९७० रोजी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. मुस्लिम सत्यशोधक मंडळ भारतीय उदारमतवादी पूरोगामी विचारांच्या उर्जस्वल परंपरेचा परिपाक होता. ते एक मुस्लिम समाजाच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण पाऊल मानले जाते. दलवाई यांना कार्य करत असताना धर्मांध, सनातनी मंडळी कडून त्रास झाला. दलवाई यांची प्रखर अशी भूमिका असल्याने त्यांचे तत्वज्ञान परंपरावाद्यांच्या पचनी पडले नाही. तरीही दलवाई यांनी मुस्लिम स्त्रीयांविषयी ज्या प्रश्नांना घेवून प्रस्थापित समाजव्यवस्था आणि तथाकथित पुरोगामी राज्यकर्त्यांशी जो

झगडा दिला. त्यामुळे मुस्लिम स्त्रियांमध्ये जागृती होण्यास, आणि इस्लामच्या चिकित्सेची परंपरा सुरू होण्यास मदत झाली.

**प्रकरण पहिले : प्रस्तावना**

प्रस्तुत प्रकरणामध्ये मुस्लिम समाजाच्या ऐतिहासिक विकासक्रमाचा थोडक्यात आढावा घेण्यात आला. भारतामध्ये इस्लामचा प्रसार कसा झाला? मुस्लिम राज्यकर्त्यांनी साम्राज्य कसे निर्माण झाले. महंमद बीन काशिम पासून शेवटचा मोघल सम्राट बहादूरशहा जफर पर्यंत धावता आढावा आलेला आहे. इस्लामच्या भारतातील प्रसाराबद्दलच्या विविध मतप्रवाहांना जाणून घेतलेले आहे. त्याचबरोबर भारताचा मध्ययुगीन इतिहास हा धर्मा-धर्मातील संघर्ष नसून तो एक सत्तेचा संघर्ष कसा होता यावर प्रकाश टाकला गेला. व्यापाराच्या निमित्ताने ब्रिटिशांनी भारतामध्ये पाय घट्ट केला आणि मुस्लिम राज्यकर्त्यांकडून सत्ता आपल्या हातात घेतली. त्यामुळे ब्रिटिशांच्या आगमनाच्या मुस्लिम समाजावर झालेल्या परिणामाची चर्चा केली गेली. विशेषत: मुस्लिम समाजाचे हस्तव्यवसाय बंद पडून मुस्लिम कारागीर बेकार झाले. ब्रिटिशांनी आपली सत्ता हिसकावून घेतली या विशिष्ट मानसिकतेने पछाडलेल्या मुस्लिम सनातनी धर्मगुरूवर झालेल्या परिणामांची चर्चा केली गेली. त्यातुन पुढे मुस्लिम मुलतत्ववादी पुनर्रूत्थानवादी चळवळींचा कसा जन्म झाला उदा. वहाबी आंदोलन, तसेच सर सय्यद अहमद यांनी मुस्लिम समाजसुधारणेचा केलेला अल्पसा प्रयत्न आणि नंतर त्यांनी घेतलेली ब्रिटिश धार्जिनी भूमिका त्यातून मुस्लिम समाजामध्ये अलगतेची भावना कशी वाढत गेली. त्यातून भारताच्या फाळणीसाठी अनुकूल वातावरण कसे निर्माण झाले इत्यादी बाबींचे विवेचन करण्यात आले. स्वतंत्र भारतामध्ये मुस्लिम समाजाची स्थिती, तसेच मुस्लिम समाजामध्ये आधुनिकीकरणात येणाऱ्या अडचणी काय आहेत याचा परामर्श घेवून हमीद दलवाई यांचा संपूर्ण जीवन परिचय जाणून घेतलेला आहे. तसेच प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये ज्या संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे याचा आढावा आलेला आहे.

## प्रकरण दुसरे : मुस्लिम सत्यशोधक मंडळ स्थापना आणि कार्य

प्रस्तुत प्रकरणात मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्याचा आढावा घेण्यात आला. हमीद दलवाई यांना मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेची गरज का भासली? मंडळाची स्थापना करण्यामागची त्यांची भूमिका काय होती? याची वस्तुनिष्ठ मांडणी करण्यात आली. हमीद दलवाई यांना मुस्लिम समाज प्रबोधनासाठी त्याची गरज वाटत होती. मुस्लिम समाजात आधुनिकतावादी प्रवाह सुरू करण्यासाठी त्यांना मंडळ स्थापण्याची गरज वाटे. मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेच्या कार्यात ज्या पुरोगामी मंडळींचा सहभाग लाभला त्या सर्वांचा उल्लेख प्रस्तुत प्रकरणात करून मंडळ स्थापनेसाठी ज्या घटकांची प्रेरणा मिळाली इत्यादी सर्व बाबींचा आढावा घेण्यात आला. तसेच मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या जाहिरनाम्यामध्ये कोणत्या गोष्टी नमूंद करण्यात आल्या आणि मंडळाची संघटना कार्य या सर्व गोष्टींचा खुलासा प्रस्तुत प्रकरणामध्ये केला गेला. मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे सभासद, सभासदत्वाच्या अटी, कार्यक्रमाची रूपरेषा, सभासदांचे हक्क काय आहेत अशा अनेक पैलूंवर प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

मुस्लिम सत्यशोधक मंडळ स्थापनेमागे निश्चित अशा उद्दिष्टांना समोर ठेवण्यात आले होते. त्या सर्व उद्दिष्टांचा समावेश प्रस्तुत प्रकरणात करण्यात आला. त्यामध्ये, हिंदू-मुस्लिम ऐक्य प्रस्थापित करणे, मुस्लिम समाजाचा धर्माकडे बघण्याचा पारंपारिक दृष्टीकोन बदलून वैज्ञानिक दृष्टीकोनाची परंपरा घालून देणे. मुस्लिम स्त्रियामध्ये आपल्या हक्काविषयी जाणीव जागृती करणे. मुस्लिम समाजात धर्मचिकित्सेची परंपरा घालून देणे. मुस्लिम समाजातील परदा, जूबानी तलाक, बहुपत्नीत्व, कुटुंबनियोजनाबद्दलच्या अंधश्रद्धा इत्यादी कालबाह्य गोष्टींचे उच्चाटन करणे. समाननागरी कायद्याचे समर्थन करणे त्यासाठी प्रयत्न करणे. मुस्लिम समाजाच्या भाषेविषयीचे गैरसमज दूर करणे. मुस्लिम समाजात धर्मनिरपेक्षता हे मूल्य अधिक सक्षमतेने बिंबविणे. इत्यादी उद्दिष्टांबद्दल सविस्तर आढावा घेण्यात आलेला आहे.

मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे संघटन कसे कार्य करते संघटनांचे स्वरूप व पदाधिकारी कसे निवडले जातात इत्यादी घटकांचा परामर्श घेण्यात आलेला आहे. त्याच बरोबर मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या विचारसरणीवर प्रकाश टाकण्यात आला. आजमितीपर्यंत मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या माध्यमाने काढण्यात आलेले मोर्चे, आंदोलने, विविध परिषदा, उपोषणे, निदर्शने अर्थात एकूण कार्यक्रमाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

**प्रकरण तिसरे : हमीद दलवाई यांचे राजकीय व सामाजिक आणि धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचे विचार**

प्रस्तुत प्रकरणामध्ये हमीद दलवाई यांच्या राजकीय, सामाजिक तसेच धर्मनिरपेक्षतेच्या भूमिकेचा आढावा घेण्यात आला. प्रामुख्याने हमीद दलवाई यांनी भारतीय मुस्लिम समाजाचे स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडातील राजकारणाची जी चिकित्सा केली त्याचा वस्तुनिष्ठ आढावा घेण्यात आलेला आहे. ब्रिटिश सत्ता भारतामध्ये प्रस्थापित झाल्यानंतर मुस्लिम धार्मिक चळवळींचा उदय झाला. वहाबी आंदोलनाबद्दल हमीद दलवाई यांची भूमिका सर सय्यद अहमद बद्दल, हमीद दलवाई यांचे मत काय होते. मुस्लिम सुशिक्षित वर्गाचे आंदोलन त्यातून पाकिस्तानच्या मागणीची चळवळ कशी सुरू झाली. ब्रिटिश भेदनीती, हिंदू-मुस्लिम जमातवादाने फाळणी कशी झाली याबद्दल हमीद दलवाई यांनी केलेल्या मांडणीचा संपूर्ण आढावा प्रस्तुत प्रकरणात घेतला गेला. भारताच्या फाळणीसाठी जीना यांच्या राजकीय डावपेचांवर प्रकाश टाकलेला आहे. १९३७ च्या निवडणूकानंतर मुस्लिम लीगच्या अपयशाने खचलेले जीना अनाठायी मागण्या करू लागले. शेवटी स्वतंत्र पाकिस्तानच्या निर्मितीची घोषणा ते करू लागले या सर्व घटकांचा दलवाई यांच्या दृष्टीकोनातून आढावा घेण्यात आलेला आहे. भारत-पाकिस्तान फाळणीमध्ये मुस्लिम जमातवाद्यांनी जी भूमिका बजावली त्याचा वस्तुनिष्ठ आढावा प्रस्तुत प्रकरणात घेण्यात आला. तसेच फाळणी होण्यास खरी कारणे कोणती होती ती अपरिहार्य होती का या प्रश्नांचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

स्वतंत्र भारतामध्ये हिंदू-मुस्लिम प्रश्न कळीचे मुद्दे बनले. वाढता मुस्लिम जमातवाद त्याची कारणे शोधण्याचा दलवाई यांनी प्रयत्न केला. दलवाई यांनी स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मुस्लिम राजकारणावर प्रकाश टाकला आणि त्यामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांचा आढावा घेतला त्यामध्ये प्रामुख्याने कॉंग्रेसने घेतलेली प्रतिगामी भूमिका, मुस्लिम द्वेषावर उभी असणारी संघपरिवाराची जातीद्वेषाची भूमिका इत्यादी घटकांचा आढावा प्रस्तुत प्रकरणामध्ये आलेला आहे. तसेच मुस्लिम समाजात सामाजिक सुधारणांची गरज का आहे, याचाही आढावा घेतला गेला.

हमीद दलवाई यांनी धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचे समर्थन केले. त्यांच्या धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाच्या विचारांना जाणून घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रकरणात केलेला आहे. हमीद दलवाई यांना हिंदू-मुस्लिम समाजातील धर्मांधता ही राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाला घातक वाटत होती. जमातवाद राजकीय व्यवस्थेत सारखाच घातक असतो. अशी दलवाई यांची भूमिका होती. त्यासाठी त्यांनी हिंदू राष्ट्रवादाची चिकित्सा केली. त्याचाही वस्तुनिष्ठ आढावा प्रस्तुत प्रकरणात आलेला आहे.

**प्रकरण चौथे : हमीद दलवाई यांच्या विचारांचे टीकात्मक परिक्षण आणि समकालीन प्रस्तुतता**

हमीद दलवाई यांच्या विचारांवर आणि भूमिकेवर टीका करणारा वर्ग दलवाईंच्या काळात होता आणि आजही तो कायम आहे. हमीद दलवाई यांच्यावर टीका करणारे दोन मतप्रवाह आहेत. पहिला मतप्रवाह मुस्लिम सनातनी लोकांचा आहे. जे दलवाईंची संपूर्ण भूमिकाच चुकीची आहे असे म्हणतात. दुसरा गट दलवाई यांची भूमिका, एजंडा, कार्यक्रम योग्य आहे. परंतु त्यांची प्रबोधनाची पद्धत हिंसक, जहाल टोकाची आहे. असे दोन गट आहेत. प्रस्तुत प्रकरणामध्ये या दोन्ही मतप्रवाहांचा चिकित्सक आढावा घेतला गेला. तसेच समकालीन राजकीय, सामाजिक स्थितीचा आढावा घेतला असता १९९० नंतर ज्या घटना घडल्या मग ती बाबरी मस्जिदची असो

अथवा गुजरात दंगलीची, हिंदु-मुस्लिम तणाव वाढलेले आहेत. त्यामुळे हमीद दलवाई यांच्या धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाच्या विचारांची त्यांनी घेतलेल्या भूमिकेशी प्रस्तुतता आजही कायम आहे. प्रस्तुत प्रकरणात आजच्या परिस्थितीच्या संदर्भात हमीद दलवाई यांच्या विचारांची समकालीन प्रस्तुतता तपासली गेलेली आहे.

**प्रकरण पाचवे : उपसंहार**

प्रस्तुत प्रकरणामध्ये शोध प्रबंधातील सर्व प्रकरणांचा थोडक्यात सारांश घेवून हमीद दलवाई यांच्या राजकीय व सामाजिक विचारांचे मुल्यमापन करण्यात आलेले आहे. तसेच मुस्लिम समाजाच्या संदर्भात आर्थिक सामाजिक घटक या दृष्टीने विचार करून काही उपाययोजना सुचविलेल्या आहेत. तसेच मुस्लिम सत्यशोधक मंडळाबद्दल भावी उपाययोजना सुचविलेल्या आहेत. तसेच मंडळाच्या कार्याचे यशापयशाचे परीक्षण करण्यात आलेले आहे.

**मूल्यमापन :**

हमीद दलवाई यांचे राजकीय आणि सामाजिक विचारांने मुस्लिम समाजामध्ये पुरोगामी विचारांची परंपरा रूजली. धर्म आणि राजकारण यांची सरमिसळ झाल्याने धर्मसंस्थेचा राज्य संस्थेवर प्रभाव वाढतो. राज्यसंस्था आणि धर्मसंस्था हे दोन भिन्न घटक आहेत. पारंपारिक समाजव्यवस्थेमध्ये धर्म आणि राजकारण यामध्ये सरमिसळ होत असते. त्यामुळे समाजाला ते घातक आहे. हमीद दलवाई यांनी धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचे विचार मांडले. ते भारतीय समाजव्यवस्थेला उपयुक्त आहेत. कारण आजही हिंदू-मुस्लिम समाजातील धर्मांध शक्ती जातीय सलोखा बिघडविण्याचे काम करताना दिसतात. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेला ते घातक आहे.

हमीद दलवाई यांनी 'इस्लाम'ची चिकित्सा केली. इस्लामची चिकित्सा होणे आज गरजेचे आहे. मुस्लिम समाजाला बदलत्या काळानूसार आपल्या बदलत्या भूमिकांचे आकलन व्हावे, समाज इतर समाजाप्रमाणे पुरोगामी विचार करणारा बनावा

यासाठी गरजेचे आहे. याचा अर्थ संपूर्ण मुस्लिम समाज प्रतिगामी आहे असे होत नाही. मुस्लिम समाजात सनातनी मंडळींकडून कमालीचा परंपरावाद जोपासला जातो. धर्माच्या आधाराने अनेक अंधश्रद्धांचा प्रसार केला जातो. मध्ययुगीन मिथके उभी करून मुस्लिम समाजाची दिशाभूल होते. या सर्व गोष्टींना आळा बसला पाहिजे. धर्माचा खरा अर्थ सांगणारे पुरोगामी लोक मुस्लिम समाजात अलीकडच्या काळात उदयास आलेले आहेत. ही निश्चित स्वागतार्ह बाब मानावी लागेल. धर्माचा कालोचीत अर्थ सांगण्याची आज खरीच गरज आहे. त्याशिवाय धर्माच्या नावाने क्षणभंगुर स्वार्थासाठी उभे केलेले भ्रम दूर होणार नाहीत. मुस्लिम समाजात जी धर्मचिकित्सेची परंपरा सुरू झाली याचे श्रेय निश्चितपणे हमीद दलवाई यांना द्यावे लागेल.

'इस्लाम' धर्मचिकित्सा करीत असताना दलवाई यांनी कडक भूमिका घेतली. परंपरावादी समाजाला टोकाची चिकित्सा पचनी पडत नाही. मुस्लिम समाजात तर ते अधिक कठीण आहे. दलवाई यांनी इस्लामच्या केवळ दोषावर बोट ठेवले, इस्लाम मधील चिरंतन गोष्टीकडे त्यांनी लक्ष दिले नाही. धर्मचिकित्सा करणे म्हणजे केवळ एकांगीपणे दोष दाखवत बसणे नव्हे तर, धर्मातील चिरंतनत्व सांगणे गरजेचे असते. चिरंतन काय आणि त्याज्य काय? याचा सारासार विचार करावा लागतो. दलवाई यांची इस्लामविषयीची टोकाची भूमिका आणि त्याचा नास्तिकपणा यामुळे मुस्लिम समाजाने त्यांच्या भूमिकेला विरोध केला. दलवाई यांचा ईहवाद हा त्यांचा वैयक्तिक होता. परंतु त्याचा आधार घेऊन सनातनी मुस्लिमांना दलवाईंना बदनाम करण्याचे आयते अस्त्र मिळाले. मुस्लिम समाजात धर्मचिकित्सा अस्तेवाहिकरित्या करणे गरजेचे आहे.

मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या माध्यमाने हमीद दलवाई आणि त्यांच्या सहकार्यांने ज्या परिषदा, कार्यक्रम, मोर्चे, स्त्रियांविषयी भूमिका मांडल्या त्यामाध्यमाने मुस्लिम समाजात विशेषत्तः मुस्लिम स्त्रियांमध्ये आपल्या हक्काविषयी जाणीव जागृती झाली. जूबानी तलाक, बहुपत्नीत्व, कुटुंबनियोजन याबद्दल मुस्लिम समाजात योग्य

प्रबोधन झाले. मुस्लिम समाजातून म्हणून आज अनेक पुरोगामी लोक जागृत होऊन निर्भिडपणे आपले विचार मांडू लागलेले दिसेनात. ह्या बदलामध्ये मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा निश्चितपणे वाटा आहे.

मुस्लिम समाजसुधारणावादी मंडळाचा कार्यक्रम योग्य होता परंतु दलवाईंनंतर तो सुधारणावादी कार्यक्रम समाजाला पटऊन देण्यास मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्यांना म्हणावे तितके यश लाभले नाही. परंतु परिवर्तनाच्या दृष्टीने उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. अंतिमत: मंडळाच्या भूमिका मुस्लिम समाजमनाला मान्य कराव्या लागतील.

अल्पसंख्यांक मुस्लिम समाजाचे आरोग्य, शिक्षण राजकीय परिस्थिती, दारिद्र्य इत्यादी प्रश्नांना घेऊन मुस्लिम सत्यशोधक मंडळाने चळवळ उभा केली नसल्याने बहुसंख्येने मुस्लिम समाजाचा तिला पाठिंबा मिळाला नाही. शिक्षणविषयक परिषदा घेतल्या गेल्या मात्र शिक्षणासाठीचा रचनात्मक कार्यक्रम ठरविणे गरजेचे होते ते झाले नाही.

हमीद दलवाई तडफदार, बुद्धीमान व्यक्तीमत्त्व होते. हमीद दलवाई यांनी मुस्लिम समाजाला योग्य दिशा आणि मार्ग दाखविला. परंतु ज्या अपेक्षेने मुस्लिम समाजाला त्यांनी जाण्यास सांगीतले त्या अपेक्षेने हा समाज जावू शकला नाही ही मुस्लिम समाजाची शोकांतिका म्हणावी लागले.

ईस्लाम हा ईश्वर केंद्रीत धर्म आहे हिंदू-बौद्ध जैन हे ईश्वर केंद्रीत धर्म नाहीत. इस्लाम ईश्वर केंद्रीत असल्याने मुस्लिम समाजातील सनातनी बदलांना सहजा सहजी तयार होत नाहीत. त्यामुळे सुधारणांना विरोध होतो. हमीद दलवाईंना मुस्लिम समाजात आमुलाग्र बदल घडवायचे होते. त्यासाठी त्यांनी ज्या सुधारणा आणल्या त्यास धर्मांध मुस्लिमांनी विरोध केला.

आज मुस्लिम समाजाचा सामाजिक व आर्थिक घटक म्हणून विचार होणे गरजेचे आहे. मुस्लिम जातीयतेची पाळेमुळे ज्याप्रमाणे धर्मांधतेमध्ये दिसतात त्याच प्रमाणे त्यासर्व घटकांना आर्थिक कारणेही तितकीच महत्त्वाची आहेत. मुस्लिम समाजाची आर्थिक व सामाजिक व राजकीय स्थिती सुधारल्याशिवाय मुस्लिम समाजातील धर्मांधता नष्ट होणार नाही. कारण आर्थिक, सामाजिक त्यामध्ये शिक्षण आणि राजकीय अशा सर्वच आघाड्यावर मुस्लिम समाज इतर समाजाच्या तुलनेत मागासलेला आहे. आज भारतामध्ये मुसलमानांची लोकसंख्या १३.४% म्हणजे १५ कोटी आहे. भारतातील अल्पसंख्य समुदायात सर्वात मोठा अल्पसंख्य समुदाय मुस्लिम समाज आहे. इतक्या मोठ्या अल्पसंख्यांक समुदायाचे मागासलेपण देशाच्या प्रगतीच्या मार्गातील अडथळा आहे.

भारत सरकार प्रधानमंत्री कार्यालयातील ९ मार्च २००५ च्या परिपत्रकानुसार मुस्लिम समाजाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय स्थितीचा आढावा घेण्यासाठी समिती स्थापन करण्याची सुचना करण्यात आली. त्यानुसार मा. न्यायमूर्ती राजिंदर सच्चर यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती स्थापन केली. त्यामध्ये मुस्लिम समाजातील शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे असे समितीला दिसले, मुस्लिम समाजातील साक्षरतेचे प्रमाण ५२.७% इतके आहे. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणामधील मुस्लिम मुलांचे प्रमाण कमी आहे. उच्च शिक्षणापर्यंत ४% मुस्लिम विद्यार्थी पोहचतात. त्यामध्येही तांत्रिकदृष्ट्या ०.४% इतकेच पात्र ठरतात. Indian Institute of Management व Indian Institute of Technology मध्ये मुस्लिम विद्यार्थ्यांची संख्या ४७४३ पैकी केवळ ६३ इतकीच आहे. मदरशामधून फक्त ३% मुस्लिम मुले शिकतात. नोकऱ्यांमध्ये मुस्लिमांचे प्रमाण अत्यल्प आहे. लहान किरकोळ व्यवसायात मुस्लिमांचे प्रमाण जास्त आहे. बिडी/तंबाकू उद्योगात मुस्लिम स्त्रियांचे प्रमाण ३५% व ४१% इतके आहे. कर्ज प्राप्तीच्या संधीमध्ये भेदभाव दिसतो. पायाभूत

सुविधा पुरेशा मिळत नाहीत. आरोग्याबद्दलही सच्चर समितीशी नाराजी व्यक्त केलेली दिसते. भारतातील एकुण लोकसंख्येच्या २२०७ लोक दारिद्र्य रेषेखाली आहेत. यामध्ये SC/ST प्रवर्गातील लोकांचे दारिद्र्याचे प्रमाण ३५% तर मुस्लिमांचे ३१% इतके आहे. देशातील विविध पातळ्यावर मुस्लिम समाजाच्या मागासलेपणाचे न्या. सच्चर समितीने वस्तुनिष्ठ निरिक्षण करून ज्या उपाय योजना सांगीतल्या त्या अतिशय महत्त्वाच्या आहेत. त्या उपाय योजना अंमलात आल्या तर मुस्लिम समाजाची भौतिक प्रगती निश्चितपणे होण्यास मदत होईल. आणि मुस्लिम समाज भारतीय संघराज्यात अधिक अस्थेवाईकरित्या जोडला जाईल. विकासाच्या सर्वच आघाड्यांवर पाठीमागे राहिलेल्या मुस्लिम समाजामध्ये जो न्यूनगंड निर्माण झालेला आहे. तो दूर होण्यास मदत होईल, व त्या समाजाला जी अकारण सर्वच बाबतीत असुरक्षितता वाटते ती दूर होईल. त्याच बरोबर दारिद्र्यामुळे जे मुस्लिम लोक धर्मांध मंडळींच्या आधीन गेलेले आहेत. त्यातून ते मुक्त होतील. त्यामुळे यापुढे मुस्लिम प्रश्नांचा विचार सामाजिक, राजकीय व आर्थिक घटक म्हणून करावा लागणार आहे. धर्म काय सांगतो हे पाहत बसण्यापेक्षा समाजाला आजच्या स्थितीत काय आवश्यक आहे हे पाहणे गरजेचे आहे.

हमीद दलवाई यांनी आपल्या संपूर्ण जीवनकार्यात मुस्लिम समाजाच्या सुधारणांसाठी जे योगदान दिले ते महत्त्वपूर्ण आहेत. त्यांच्या विचारांमध्ये दोष आहेत. परंतु त्यांच्या विचारातील चिरंतनपणा मुस्लिम समाजाने स्वीकारला पाहिजे. मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्याला जरी मोठ्या प्रमाणात मुस्लिम समाजात पाठींबा मिळला नसला तरी मंडळाचे कार्य स्वागत करण्यासारखे आहे. मंडळाच्या कार्याने व हमीद दलवाई यांच्या विचाराने. मुस्लिम स्त्रियांमध्ये निश्चितपणे आपल्या हक्काविषयी जाणीव जागृती झाली. मुस्लिम समाजात राजकीय जागृती होण्यास मदत झाली. धर्मचिकित्सेची परंपरा या समाजात रूजली. त्यामुळे ~~समकालीन भारतीय समाजात~~ हमीद दलवाई यांच्या राजकीय, सामाजिक, धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाच्या विचारांची प्रस्तुतता

संपलेली नाही तर ती अधिक वाढलेली आहे. हमीद दलवाई यांनी त्यांच्या मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या परिवाराने ज्या भूमिका मांडलेल्या आहेत त्या भूमिका मुस्लिम समुदायाला अंतिमत: स्वीकाराव्या लागतील. तेव्हा मात्र हमीद दलवाई आणि त्यांच्या मुस्लिम सत्यशोधकांचा या कार्यातील वाटा फार मोठा असणार आहे.

आजही मुस्लिम सत्यशोधक मंडळाची घोडदौड सुरू आहे. मुस्लिम सत्यशोधक मंडळाने सामुहिक नेतृत्त्व स्वीकारलेले आहे. मुस्लिम स्त्रियांविषयी प्रथम मुस्लिम सत्यशोधक मंडळाने काम सुरू केले. आज जवळ जवळ १६ राज्यातून मुस्लिम स्त्रियांच्या पुरोगामी संघटना स्थापन झालेल्या आहेत. या संघटनांच्या माध्यमाने मुस्लिम सत्यशोधक मंडळाने ज्या प्रश्नांना घेऊन चळवळ केली, त्यानुसारच मुस्लिम स्त्रियांसंबंधी प्रश्न घेऊन या संघटना कार्य करीत आहेत. मुस्लिम स्त्रियांमध्ये ही जी जागृती दिसून येत आहे त्यामध्ये मुस्लिम सत्यशोधक परिवाराचा निश्चितपणे वाटा आहे.

मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या अलिकडच्या कार्याचा आढावा घेतल्यास लक्षात येते की, मुस्लिम सत्यशोधक मंडळाने ज्या स्त्रीविषयी प्रश्न हाती घेतले होते. त्या समस्यांची तीव्रता पूर्वी इतकी राहिलेली नाही. परंतु हे प्रश्न पूर्णपणे निकालात निघालेले आहेत असे म्हणता येत नाही. तसेच हमीद दलवाई नंतर मंडळाने सामुहिक नेतृत्त्व स्वीकारले. मंडळामध्ये नवीन पीढी तयार झाली नाही. काही अपवाद वगळता मंडळाच्या कार्यामध्ये नवीन पिढीने काही महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नांना घेऊन समाजप्रबोधन करणे गरजेचे होते तसे न झाल्याने एकप्रकारची मरगळीची स्थिती निर्माण झालेली आहे. अशा परिस्थितीमध्ये जूने न सुटलेल्या प्रश्नाबरोबर आज समाजामध्ये भेडसावणाऱ्या नव्या प्रश्नांना घेवून मंडळाने रचनात्मक कार्याची आखणी करण्याची गरज आहे.

आज मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्यामुळे मुस्लिम स्त्रियांमध्ये जागृती निर्माण झालेली आहे. मुस्लिम व्यक्तिगत कायद्यामध्ये सुधारणा करण्याच्या कायद्याला यामुळे चालना मिळालेली दिसते. महाराष्ट्रात तसेच बंगाल, केरळ, तसेच भारतातील अनेक राज्यांतून मुस्लिम सत्यशोधक मंडळाला समांतर असणाऱ्या अनेक स्त्री संघटना उदयाला आलेल्या आहेत हे मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे यश आहे. मुस्लिम समाजातील तरूण पिढीने फाळणीचे ओझे फेकून दिलेले आहे. या नव्या पिढीला शिक्षणाचा आणि आर्थिक आधार मिळाल्यास मुल्ला-मौलवींच्या पाशातून स्वत:ला निश्चितपणे मुक्त करतील. त्यांना या धर्मांधाच्या आधाराची गरज उरणार नाही. नवीन भारत देशया जडणघडणीमध्ये आणि उभारणक्षमध्ये त्यांच्याकडे विश्वासाने, आशेने पाहता येईल.